Tactful Management Research Journal
Vol. 2 , Issue. 2 , Nov 2013
ISSN :2319-7943
Impact Factor : 0.179

ORIGINAL ARTICLE

शासकीय जिल्हा उद्योग केंन्द्राच्या भूमिकेचे तुलनात्मक अध्ययन (संदर्भ : ठाणे जिल्हा ग्रामीण व शहरी विभाग)

वाय. एस कदम , एस बी गोलाईत

साठये महाविद्यालय दिक्षित रोड, विलेपार्ले (पू) मुंबई (महाराष्ट्र)
अर्थशास्त्र विभाग प्रमुख एस. पी. डी. एम कॉलेज शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे

सारांश

देशाच्या विकासात उद्योग व्यवसाय महत्वपूर्ण भूमिका बजावतात. भारत देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी सामान्यतः ६०ः जनता ग्रामीण परिसरात राहते तर ४०ः जनता नागरी (शहरी) भागात राहते. अशा संपूर्ण जनतेस आवश्यक असलेल्या साधनसुविधामध्ये मोठया प्रमाणावर असमतोल आपणास दिसून येतो. आवश्यक सुविधा ज्यात रस्ते, विज, पाणी, अन्नधान्य हयात सुध्दा फार मोठया प्रमाणात असमतोल असल्याचे आपणास दिसून येते. सामान्यतः देशातला सर्वात मोठा लोकसंख्येचा भाग हा शेती हया व्यवसायावर अवलंबून आहे. श्शेती हा व्यवसाय ब–याच प्रदेशात असलेल्या विकासाच्या असमतोलामुळे निश्चित उत्पन्न देवू शकत नाही. तसेच शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे साधारणतः ग्रामीण परिसरातल्या जनतेला आवश्यक व पुरेशा प्रमाणात रोजगार उपलब्ध होत नाहीत. रोजगाराच्या संधी प्रत्येक वेळी अनिश्चित स्वरुपात असतात.

स्वातंत्रप्राप्तीनंतर ६५ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे. पंरतु ग्रामीण परिसरात पूर्णपणे नागरीकांना रोजगार उपलब्ध होवू शकलेला नाही. उदरनिर्वाहासाठी आवश्यक असलेली साधने उपलब्ध झाली नाही तर नागरीक रोजगाराच्या शोधार्थ एका ठिकाणाहून दुस–या ठिकाणी स्थलांतर करीत असतो. हयाच उक्तीस अनुसरुन ग्रामीण परिसरात रोजगार उपलब्ध होवू शकत नसल्याने ग्रामीण परिसरातील गरीब जनता एका ठिकाणाहून दुस–या ठिकाणी रोजगाराच्या शोधासाठी स्थलांतर करतात. हयासाठी पर्यायी व्यवसाय निर्मिती व्हावी, लोकांना सक्षम बनवणारा रोजगार निर्माण व्हावा, नागरिकाना प्रत्येक परिसरात आवश्यक साधनाच्या मदतीने रोजगार संधी निर्माण व्हावी, विकासाचा असमतोल दूर व्हावा, प्रादेशिक विकास व्हावा असलेल्या कौशल्याचा वापर व्हावा, रोजगार हि एक समस्या न होता प्रत्येकाची गरज व्हावी व त्यास योग्य काम उपलब्ध व्हावे व त्याच्या ज्ञानाचा राष्ट्र विकासात उपयोग व्हावा हयासाठी केन्द्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, उद्योगाचे विकेन्द्रीकरण व्हावे, प्रादेशिक असमतोल दुर व्हावा हयासाठी प्रत्येक जिल्हयात संपूर्ण राष्ट्रात जिल्हा उद्योग केन्द्र ख्क्पेजतपबज प्दकनेजतपमे ब्मदजतम, हया योजनेला सुरुवात केलेली आहे. देशभरात केन्द्रसरकार राज्य सरकारांच्या मदतीने जिल्हा उद्योग केन्द्राच्या माध्यमाने नागरीकाना रोजगार व्यवसायनिर्मिती कामी विविध योजना राबवण्या कामी महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. लघु कुटीर, मध्यम व मोठे उद्योगधंदे निर्मितीकामी मार्गदर्शन व सल्लागार म्हणून कार्यात सहभागी होणे व त्यासाठी आवश्यक साधनांची उदा. विज, पाणी, यंत्रसामग्री, कर्जपुरवठा, प्रकल्प नोदंणी, विषेश मार्गदर्शन व उपलब्धते संदर्भात सविस्तर माहिती शासनाच्या विविध विभागाद्वारे उपलब्ध करुन देण्यात मोलाची भूमिका पार पाडत आहे.

देशाच्या विकासात उद्योग धंदयाचा सहभाग मोठा असेल तर नागरिकाच्या रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात वाढू शकतात व त्यांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यास मदत होवू शकते व त्यामुळे बेरोजगारी, गरीबी, प्रादेशीक असमतोल हया प्रकारच्या राष्ट्रासमोरील समस्या सोडवण्यास मदत होते. व हयाचसाठी देश औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत अग्रस्थानी असणे काळाची गरज आहे. उद्योग व्यवसायाचा विकास झाल्यास रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतात

कि वर्ड– जिल्हा उद्योग केन्द्र, औद्योगिकरण, रोजगार विकास, कुटीरोद्योग, लघुउद्योग, मध्यम व मोठया स्वरुपाचे उद्योग, स्वयम्उद्योजकता

प्रस्तावना

देशाच्या विकासात उद्योगधंदे महत्वपूर्ण भूमिका बजावतात व त्याद्वारे पुढील समस्या सोडवण्यास मदत होते.

उदा : बेरोजगारी, गरीबी, प्रादेशिक असमतोल
हयासाठी देश औद्योगीकरणाच्या प्रकियेत अग्रस्थानी असणे काळाची गरज आहे.
उद्योग व्यवसायांचा विकास झाल्यास रोजगाराच्या नविन संधी निर्माण होतात व राष्ट्र विकसीत होते. हयासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर उद्योगनिर्मिती होणे गरजेचे ठरते. केन्द्र व राज्य सरकार संपुर्ण देशात उद्योग विकास करणेसाठी प्रयत्नशील आहे व त्याद्वारे पुढील महत्वपूर्ण फायदे होतात.

अ. रोजगार निर्मिती
ब. विकसनशील समाज
क. आर्थिक स्तरात सुधारणा
ड. दरडोई उत्पन्नात वाढ
इ. शक्ति शाली राष्ट्र

Please cite this Article as : *वाय. एस कदम , एस बी गोलाईत ,शासकीय जिल्हा उद्योग केंन्द्राच्या भूमिकेचे तुलनात्मक अध्ययन (संदर्भ : ठाणे जिल्हा ग्रामीण व शहरी विभाग)* **: Tactful Management Research Journal (Nov ; 2013)**

देशाचा विकास आपणास देशात उपलब्ध असलेल्या संधीद्वारे लक्षात येतो प्रत्येक नागरीकास त्याच्या उदरनिर्वाहासाठी रोजगार अथवा व्यवसाय हयात सहभाग अपेक्षीत असतो. शासन स्तरावर नागरीकाच्या विकासास अनुसरुन वाढ व्हावी म्हणून प्रयत्न चालू असतात योजना कार्यान्वित होत असतात. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमाद्वारे देशातील नागरीकांना मोठया प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण झाल्यात तर बेरोजगारीवर तो एक उपाय ठरु शकतो व त्याद्वारे देशाची आर्थिक उन्नती होण्यास एक महत्वपूर्ण दुवा व्यवसाय विकास ठरु शकतात. नागरीकांना चांगला रोजगार उपलब्ध झाला तर देशाची आर्थिक परिस्थिती व नागरीकांचे दरडोई उत्पन्नात वाढ होवू शकते.

स्वांतत्र्य पूर्व काळात भारतात औद्योगिक धोरणा संदर्भात विशेष स्वरुपात प्रगती झालेली नव्हती देशातल्या काही प्रदेशात औद्योगीकरणाला थोडया फार प्रमाणात सुरुवात झालेली होती परंतु स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगीक प्रकियेला गती मिळाली. 1948 चे औद्योगीक धोरण व 1956 चे नविन औद्योगीक धोरण हे उद्योग वाढीसाठी प्रगतीदायी ठरले. 1940 ते 1980 हया काळात उद्योगवाढीचा विकास दर हा फक्त 1.4 % इतकाच होता कारण खाजगी क्षेत्रात उद्योग व्यवसाय स्थापनेसाठी सरकारी परवानगी मिळवणे हे अंत्यय जिकरीचे व कठीण तसेच वेळ काढू स्वरुपाचे काम होते.

1980 नंतर चित्र बदलले मुक्त अर्थव्यवस्थेचे वारे वाहु लागल्यामुळे विकास दराच्या वाढीत देशाने चांगली प्रगती केली देशाच्या एकूण निर्यात वस्तुचा वाटा आपला 27 % इतका होता.

मुक्त आर्थिक धोरणामुळे उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी खाजगी व सरकारी क्षेत्रात मोठा वाव उपलब्ध झाला निर्यातीतील वाढीचे प्रमाण 1995–96 या कालावधीत 28 % एवढे वाढले.

Importance Of Study

अभ्यास संशोधनाचे महत्व :

कुटीरोद्योग व लघुउद्योग विकासाचे कार्य देशातील सर्व जिल्हांत जिल्हा उद्योग केन्द्राद्वारे केले जाते. अशा योजनांचा सविस्तर शास्त्रीय स्वरुपात अभ्यास केला तर निश्चितच मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. बेरोजगारीच्या समस्येला आळा बसेल. नवे व्यवसाय निर्माण होतील. नवउद्योजक, स्वयंम रोजगार. याद्वारे देशातल्या नागरीकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होईल. हा एक महत्वाचा धागा हया संशोधन अभ्यास कार्यात अपेक्षित आहे.

जिल्हा उद्योग केन्द्राद्वारे विविध योजना राबवल्या जातात त्यापैकी काही आपणास पुढीलप्रमाण मांडता येतील.
पतंप्रधान रोजगार योजना व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम.
बॅकाकडून व्यवसायासाठी कर्जपुरवठा उपलब्ध करुन देण्यासाठी सल्लागार व मार्गदर्शक म्हणून भूमिका.
उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम.
हस्तकला / कुशल कारागीर यांचेसाठी विशेष योजना राबवणे.
लघुउद्योग नोंदणी प्रमाणपत्र धारकास शासकीय नियमानुसार सुविधा उपलब्ध करुन देणे.
सुशिक्षित बेरोजगारासाठी अर्थसहाय्य (बिज भांडवल योजना) ग्रामीण कारागीरांसाठी योजना – जिल्हा उद्योग केन्द्र कर्ज योजना
सामुहिक प्रोत्साहन योजना 2007

केंद्र सरकारच्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालयाची योजना
राष्ट्रीय उत्पादन स्पर्धात्मक कार्यक्रम (एन एम सी पी)
खालीत प्रमाणे 10 योजना आहेत.

1.Marketing support through bar coding
2. Support for Entrepreneurial & Managerial Development through Incubators
3. Setting up Mini Tool Rooms & Training Centre
4. Building awareness about intellectual property rights.
5. Lean Manufacturing programme.
6. Quality management standards & quality technology tools.
7. Energy Efficiency and Quality certification support.
8. Marketing assistance & up gradation of Technologies.
9. Promotion of ICT information
10. Design clinic.
Website :www.msmed;Mumbai.gov.in

उद्देश :

अभ्यास संशोधनामागील प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे आहेत. औद्योगीकरण प्रकियेचा वर्तमान परिस्थितीत अभ्यास करुन ठाणे जिल्हा एक घटक म्हणून शहरी व ग्रामीण परिसरातल्या उद्योग व्यवस्थेचे मुल्यमापण करणे ठाणे जिल्हा हा मुंबई शहरापासून अतिशय जवळ असून ठाणे ग्रामीण परिसरातल्या उद्योग विकास वाढीचा आढावा घेणे व त्याची तुलना करणे.

ठाणे जिल्हा ग्रामीण व शहरी परिसरातल्या वेगवेगळया समस्यांचा शोध घेणे.
ठाणे जिल्हयातील औद्योगिकरणासाठी उपलब्ध असलेल्या संसाधनाचा अभ्यास करणे.
औद्योगीकरणाच्या वाढीसाठी शासकीय जिल्हा औद्योगिक केन्द्रांच्या कामाचा आढावा घेणे.
औद्योगिकरण प्रकियेच्या वाढीसाठी येणा–या अडचणीचा अभ्यास करुन त्यावर पर्यायांचा शोध घेणे.
शासकीय जिल्हा उद्योग केन्द्राच्याद्वारे राबवले जाणारे उपक्रम व त्या संदर्भीय योजनाच्या माहितीचा होणा–या उपयोग संदर्भात आढावा घेणे.
जिल्हा परिसरात बेरोजगार तरुणांना दिल्या जात असलेल्या व्यवसाय मार्गदर्शन व कार्यान्वीत कार्यक्रमाचे अभ्यासपूर्वक मुल्यमापण करणे.

गेल्या तीन दशकांचा विचार केल्यास असे निदर्शनात येते की औद्योगिकरणाच्या वाढीमुळे मोठया प्रमाणावर ग्रामीण भागाचा विकास झाला आहे. औद्योगीकरणाचा विचार करताना आपणास हयात कुटीरोद्योग, ग्रामोद्योग लघुउद्योग हया सर्व स्तरांचा अभ्यास करणे हा उददेश

आहे व हया प्रत्येक विभागाच्या विकासासाठी शासकीय जिल्हा उद्योग केन्द्राची भूमिका महत्वपूर्ण ठरते

ठाणे जिल्हा व जिल्हा उद्योग केन्द्राच्या कामाचा आढावा

देशातल्या एकून जिल्हया पैकी सर्वात मोठी लोकसंख्या असलेला जिल्हा म्हणून ठाणे जिल्हा ओळखला जातो. हया जिल्हयातील सर्व प्रमुख कार्यालये ठाणे हया शहरात आहेत. हया जिल्हयातील इतर प्रमुख शहरात कल्याण, डोंबीवली, मिरा –भाईदर, भिंवडी उल्हास नगर, अंबरनाथ कुळगाव, बदलापूर, डहाणू शहापूर वाडा जिल्हयांचा समावेश होतो. या सर्वांचा एकूण परिसर 9558 कि. मी. क्षेत्रफळ एवढा आहे. 2001 च्या जणगणनेनुसार एकूण लोकसंख्या 8,131,849 एवढी दर्शवते. देशातला सर्वात मोठा जिल्हा असल्याने जिल्हयाचे शासकीय कामकाज 4 विभागात विभागले आहे.

जिल्हयातील तालुक्याची त्याच्या औद्योगिक विकासाच्या प्रतवारीवर अ, ब, क, ड आणि ड+ पाच गटात विभागणी करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	गट अ (विकसित विभाग)	गट ब	गट क	गट ड	गट ड+
1.	ठाणे, वसई, पालघर, कल्याण, उल्हास नगर, अंबरनाथ	डहाणू, मुरबाड	भिंवडी, षहापूर	निरंक	जव्हार, मोखाडा, तलासरी, वाडा, विक्रमगड

ठाणे जिल्हा व त्यातील उद्योगासंदर्भात माहिती

महाराष्ट्र राज्यात सर्वात मोठा औद्योगिक जिल्हा म्हणून ठाणे जिल्हयाचा क्रमांक लागतो हया जिल्हयात 1548 मोठे व मध्यम स्वरुपाचे तसेच 1840 लघुउद्योग स्वरुपाचे उद्योगधंदे आहेत. हयात प्रामुख्याने औषध, कापड, प्लॉस्टीक वस्तु , रबर, स्टील, रासायनिक खतनिर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स, लोंखड इ. प्रकारच्या उत्पादनांचा समावेश होतो.

ठाणे जिल्हा परिसरात काही भाग सागरी किनारा तसा खाडयांनी वेढलेला आहे त्यामुळे प्रचंड मोठे मासेमारीचे जाळे हया भागात आहे. प्रचंड मोठा रोजगार हया व्यवसायाद्वारे उपलब्ध होत असतो. त्यामुळे हयालाच अनुसरुन विशेष प्रकारचे अन्न प्रकिया व्यवसाय सुध्दा मोठया प्रमाणात हया भागात आहेत.

रेल्वेचे मोठे जाळे हया जिल्हयात उपलब्ध आहे. संपूर्ण जिल्हयात जवळपास 346 कि. मी लांबीचे रेल्वेचे ट्रॅक पश्चिम व मध्य रेल्वेचे आहेत व ठाणे, कल्याण, उल्हासनगर, शहापूर हया परिसरात वाहतुकीच्या साधनांची सुविधा असल्याने मोठा फायदा उद्योग विकासाला होत असतो.

ठाणे जिल्हयातील उद्योगाची ठळक वैशिष्ये

Highlights of Industries in Thane District

राज्यातील 3 क्रमांकाचा औद्योगिक जिल्हा
1548 मोठे व मध्यम स्वरुपाचे उद्योगधंदे
18480 लघु उद्योग व्यवसाय
प्रमुख उत्पादने : औषधे, कापड, प्लॅस्टीक, रबर, गोंद, इलेक्टॉनीक्स, यंत्रे, खते, कागद, सिमेंट, धातु, यंत्र साहित्य, स्पेअरस्पार्टस, रंग, खाद्य तेल, हातमाग, यंत्रमाग, मासेमारी व उपउत्पादने रासायनिक उत्पादने, शितयंत्रे, बेकरी, कनफेक्शनरी, चॉकलेट इत्यादी.
तारापुर औष्णीक विद्युत केन्द्र
अर्थसहाय : खाजगी व सरकारी अर्थसंस्था

बॅक ऑफ महाराष्ट्र राष्ट्रीय बॅक एकूण जिल्हाभरात 60 शाखा
जिल्हा औद्योगिकरणाची सद्यःस्थिती

ठाणे जिल्हा राज्यात क्रमांक 3 चा औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. हयात 1548 मोठे व मध्यम उद्योग नं. 18480 लघु उद्योग जिल्हयात आहेत. उद्योगाचे विभाजन जिल्हात 2 प्रकारात आहे. हयात ठाणे बेलपापूर कल्याण हा औद्योगिक पटटा म्हणून ओळखला जातो. हयात आधूनिक तंत्रज्ञान असलेल्या उद्योगाचा समावेश होतो तर अंबरनाथ, भिंवडी, बदलापूर, वसई, तारापूर, मुरबाड हया भागात विभिन्न प्रकारचे 4 हजारापेक्षा जास्त यंत्रे, स्पेअर पार्टस, इलेक्ट्रीकल्स साहित्य, लोखंड, धातू इत्यादी उत्पादने निर्माण होतात.

जिल्हा उद्योग केन्द्रातंर्गत 9000 उद्योगधंदे नोंदणीधारक आहेत. हयात लघुउद्योगाचा समावेश आहेत विना नोंदणी झालेल्या उद्योगाची संख्या अंदाजे 5000 / 6000 पर्यत असण्याचा अंदाज आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी

ठाणे जिल्हयाचे प्राचीन दस्तऐवजात श्री स्थानकी असे नाव होते व ही शिलाहर राजाची राजधानी होती. 1817 मध्ये पेशव्याकडून ब्रिटीशांनी हा परिसर आपल्या ताब्यात समाविष्ट करुन घेतला व तो उत्तर कोकण जिल्हयाचा भाग मानला जात असे नंतर दक्षिण कोकण भाग हयात समाविष्ट होवून 1853 मध्ये हयाचे नविन नामकरण ठाणे हे करण्यात आले.

कामकाजाचे दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून 1866 ला प्रशासकीय उपविभागीय म्हणून ठाणे ओळखले जावू लागले व त्यात पुर्विची राजकालीन नावे बदलून प्रमुख बदल झालेत हयात साजन चे डहाणू, कोलवणचे शहापूर, गसरापुर चे कर्जत, पेठाचे वाडा असे होवून हयांना

तालुका दर्जा देण्यात आला. 1949 ला स्वातंत्र्यानंतर जव्हार हे ठाणे जिल्हयात स्वतंत्र तालुका म्हणून सामिल झाले.

2011 च्या खानेसुमारीनुसार ठाणे जिल्हयाची लोकसंख्या अंदाजे 11 कोटी 54 लाख एवढी दर्शविली आहे. हयाची तुलना जर केली क्युबा हया राष्ट्राच्या लोकसंख्येइतकी आहे. देशातील एकूण 640 जिल्हयापैकी ठाणे जिल्हा लोकसंख्येत क्रमांक एक वर आहे.

भौगोलिक आकारमान

ठाणे जिल्हा हा सर्वात जास्त लोकसंख्या व आकारमान असलेला देशातील जिल्हा आहे. 2011 च्या माहिती नुसार जास्त लोकसंख्या असलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. हयाचे प्रमुख कार्यालय ठाणे शहर हे आहे. ठाणे जिल्हयाचा विस्तार 9558 कि. मी. इतका आहे व आजुबाजूस पुणे, अहमदनगर पुर्व गुजरात राज्य व दादरा व नगर हवेली हया केन्द शासीत प्रदेशाने घेरलेला आहे. हया सर्व प्रदेशाचा विचार केल्यास असे लक्षात येईल की मुबंई शहरालगत असल्याने हया जिल्हयाचा काही भाग हा शहरी प्रकारात मोडतो तर काही भाग हा ग्रामीण प्रकारात समाविष्ट होतो त्यामुळे उद्योग व्यवसायाचा प्रचंड पसारा असून सुध्दा दोन घटक ग्रामीण व शहरी हया भागात प्रचंड आर्थिक विषमता आहे.

गृहित प्रमेय

Hypothesis

सर्वच व्यापारी क्षेत्रांचे वैश्वीकीकरण झालेले आहे. नविन व्यावसायीक धोरणे संपूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावर राबवली जाऊ लागली आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येकाने सक्षम होणे गरजेचे आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील वैश्वीक अर्थव्यवस्था ही दोन अनुमानावर आधारीत आहे.

1.एक म्हणजे सर्व प्रकारच्या वस्तुंची बाजारपेठ ही सद्य परिस्थितीत विश्वाची बाजारपेठ समजली जाते. एका देशात तयार होणारी वस्तू विश्वात कोणत्याही परकीय देशात सहज उपलब्ध होते.

2.कोणत्याही व्यापारी वा अव्यापारी संस्थेचे यश हे त्या संस्थेच्या प्रभावी व्यवस्थापनावर अवलंबून असते. बेरोजगारीच्या वाढत्या समस्या त्यामुळे येणारे नैराश्य व नकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागतो. अशा परिस्थितीत शासकीय योजनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलतो. कामाला सुरुवात करुन प्रयत्न करण्याऐवजी त्यातल्या अडचणी समस्या याकडे जास्त लक्ष दिले जाते. त्याऐवजी विचारात सकारात्मक आणून आपले शासन आपल्या योजना आपणास त्यात निश्चितच फायदा होईल असा दृष्टीकोन बाळगणे गरजेचे आहे. या प्रकारच्या दृष्टीकोनातून जिल्हा उद्योग केन्द्राच्या विविध योजना समाजातल्या सर्व घटकांपर्यत जागरुकपणे पोहचवणे गरजेचे आहे.

3.पंचवार्षिक योजनाद्वारे एक कृती कार्यक्रम म्हणून अशा योजना मांडल्या जातात. त्याद्वारे प्रत्येक कुटूंबाला रोजगाराची व्यवसायाची संधी मिळावी अशा प्रकारचे नियोजन व त्या संदर्भात तरतूद केली जाते.

हयात दुसरा एक महत्वपूर्ण भाग म्हणजे स्पर्धला तोंड देणे व आपले स्वयम रोजगारधिष्टित उत्पादन यशस्वी करावयाचे असेल तर आपल्या स्थानिक उत्पादनाचा दर्जा हा उत्तम असणे गरजेचे आहे व हयात आपण यशस्वी ठरलो तर आपल्या उत्पादनास एक आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचण्याची संधी हि चालून येवू शकते.

स्वयम रोजगार करताना लघुउद्योग अथवा कुटीरोद्योग प्रकाराद्वारे स्थानिक परिसरात उपलब्ध असलेला साधनसंपत्तीचा योग्य वापर केला तर निश्चीतच दर्जात्मक उत्पादनासाठी आपण पात्र ठरु शकतो. अशा प्रकारे शासकीय जिल्हा उद्योग केन्द्राच्या योजनाद्वारे आपण फक्त स्वयम रोजगारधिष्टीत नव्हे तर य शस्वी उद्योजक होण्यासाठी पात्रता सिध्द करु शकतो.

4.लघु उद्योग व कुटीरोद्योगाद्वारे आपल्या देशात व्यवसायाला सुरुवात करुन आंतरराष्ट्रीय स्तरावर नामांकिताच्या यादीत प्रमुख भारतीय उद्योजकांच्या यशोगाथा आपणाकडे असंख्य उदाहरणाद्वारे उपलब्ध आहेत व त्या आदर्शाद्वारे निश्चितच आपण यशस्वी उद्योजक जिल्हा केन्द्राच्या योजनाद्वारे निर्माण करु शकतो.

5.ग्रामीण स्तरावरील पांरपारिक व्यवसायाला आधुनिकतेच्या माध्यमातून योग्य दिशा दिली तर निश्चीतच जिल्हा उद्योग केन्द्राच्या योजनांद्वारे बेरोजगारी सारख्या समस्यांना आळा बसू शकेल.

6.जिल्हा उद्योग केन्द्राच्या विविध योजना सातत्याने कार्यरत राहिल्यात तर त्या रोजगार मिळवून देण्यात महत्वपूर्ण दुवा आहेत व प्रभावी ठरतील.

7.जिल्हा उद्योग केन्द्रामुळे निश्चितच बेरोजगारी कमी होण्यास मोठया प्रमाणावर हातभार लागतो आहे व स्वयंम रोजगार वाढीसाठी मदत होत आहे.

8.जिल्हा उद्योग केन्द्र ग्रामीण बेरोजगारांना रोजगार व व्यवसाय संदर्भीय माहिती पोहचवण्याकामी मोलाचे कार्य करीत आहे व त्यामुळे ग्रामीण तसेच शहरी विकासात एक महत्वपुणे योगदान देत आहेत.

महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक धोरण :

भारत देशात महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्राचे नेतृत्व करतो अशा प्रकारची भावना देशभरात आहे. औद्योगिक क्षेत्राचा विकास करण्याकामी महाराष्ट्र राज्यात खुपच अनुकूल वातावरण आहे त्यामुळे मोठया प्रमाणात गुंतवणूक हया क्षेत्रात महाराष्ट्रातून होत असते व एक औद्योगिक वातावरण हया ठिकाणी असलेले मानव संसाधन आणि इतर उपलब्ध साधन संपत्तीचा वारसा त्यामुळे निर्माण झालेले आहे.साधारणतः 1991 पासून भारतभरात औद्योगिक सुधारणांची तसेच आर्थिक सुधारणांना सुरुवात झालेली आहे.

त्याचप्रमाणे 1993 ला महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक धोरणात विशेष सुधारणांना सुरुवात झाली. हयात रेशनींग प्रक्रिया व उद्योग, व्यापार व वाणिज्य हयात सोपेपणा घ्यावा हयावर विषेश प्रयत्न करण्यात आले.

महाराष्ट्रातील औद्योगिक विस्तार

14000 मेगावॅटपेक्षा जास्त विजनिर्मिती एकटया महाराष्ट्रात होते. देशाचा विचार करता महाराष्ट्र राज्य हयात क्रमांक एक वर आहे.

215 पेक्षा अधिक मोठया स्तरावरील औद्योगिक वसाहती महाराष्ट्र राज्यात आहेत. पंचतारांकित औद्योगिक वसाहती आणि 63 विकास केन्द्रे हया महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे विकसित केल्या गेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य व आर्थिक क्षमता

भारतामध्ये महाराष्ट्र राज्याचा दरडोई उत्पन्नामध्ये तसेच स्थानिक उत्पादनामध्ये प्रथम क्रंमाक लागतो. इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात प्रती व्यक्ती उत्पन्न 60 अधिक आहे.

सार्वजनिक गुंतवणूक निधी सगळयात जास्त वाटा महाराष्ट्र राज्याचा आहे. एकटया महाराष्ट्रात इंटरनेट वापर करण्याचा वाटा 80: आहे. साफ्टवेअर निर्यातीत हाच वाटा 30% आहे.

शेअर बाजारातली उलाढाल फक्त मुंबई हया शहरातून 70% आहे. मुबंई ही फक्त राज्याची राजधानी नसून व्यापारी राजधानी सूध्दा आहे. जवळपास सर्वच आर्थिक संस्था व बॅकाची प्रमुख कार्यालये मुबंई शहरात आहेत.

सकिय जिल्हा उद्योग केन्द्र

महाराष्ट्र सरकार उद्योग संचालनालयाच्या वतीने सर्व जिल्हयात शासकीय जिल्हा उद्योग केन्द्राच्या कार्याच्या अंमलबजावणी विस्तार विकास नियंत्रण कार्य केले जाते हयात सुक्ष्म (कुटीरोद्योग), लघु उद्योग ,मध्यम स्वरुपाचे उद्योगनिर्मितीचे कामी प्रोत्साहन दिले जाते. प्रत्येक जिल्हयात जिल्हा उद्योग केन्द्र शासकीय स्तरावर कार्यरत आहे. केन्द्राद्वारे स्वयंम रोजगार व रोजगार निर्मिती संदर्भात योजना राबवल्या जातात.

शासकीय जिल्हा उद्योग केन्द्राच्या भुमिकेचे तुलनात्मक अध्ययन प्रमुख घटक :

जिल्हा उद्योग केन्द्राच्या निर्मिती मागील पार्श्वभूमी आणि उद्देश
लोकसंख्या वाढीनुसार आवश्यक रोजगाराच्या संधी निर्मिती कामी उद्योग केन्द्राचा सुयोग्य वापर
स्थानिक स्तरावरील नैसर्गिक स्त्रोताचा योग्य वापर करुन बाजारपेठ निर्मिती कामी केन्द्राद्वारे मिळणारे प्रोत्साहन.
प्रादेशिक विकासाच्या समतोलासाठी केन्द्र स्तरावरुन प्रत्येक जिल्हयात केन्द्राची निर्मिती.
परदेशी बाजारपेठाच्या [Globalisation Of Marketing] स्पर्धत टिकावूपणा सिध्द करुन दाखवल्या संदर्भात नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर.
सुशिक्षित तरुणांना व्यावसायिक शिक्षणाद्वारे उद्योजकता विकासाकडे आकर्षित करणे.
रोजगार निर्मितीसाठी जिल्हा उद्योग केन्द्राच्या उपलब्ध संधी व शासकीय योगदान.
स्वयंम रोजगारांचे आकर्षण व उद्योजकता निर्मिती कामी उद्योग केन्द्राद्वारे निर्माण केलेल्या सुविधा स्थानिक परिसर जिल्हा त्यातील संपूर्ण माहिती हयात वातावरण, ग्रामीण शहरी परिसर पाणी, विज उपलब्धता, रस्ते वाहतुकीची साधने, पर्यावरण राज्याची आर्थिक क्षमता इत्यादी बाबींचा समावेश करणे.

शासकीय जिल्हा उद्योग केन्द्र कार्यान्वीतएम.
एस. एम. ई योजना
[Micro Small & Medium Enterprise]
[Self employment scheme for educated umployed youth]

सुशिक्षित बेरोजगारासाठी स्वयंमरोजगार योजना

सुक्ष्म व कुटीरोद्योग
[Micro & Cottage Industry]

लघु उद्योग
[Small Scale] Industry

मध्यम उद्योग
[Mediumscale] Industry

REFERENCE:

1.Ruler development Of India. R. K. Gupta
2.Indian Ecnomy – Mishra & Puri
3.Five Year planning scheme- Shubrata Gupta
4.Thane district socio economic review
5.Economic survey of Statistic planning development Mumbai Maharashtra
6.District Industries Centre [Action Plan] 1996-2000.
7.www. udyogmitra ac.in
8.Thane Statistical abstract of Thane District
9.Annual Credit Plan [Bank of Maharashtra]
10.Thane District – Wikipedia/org/ encylopidia
11.Govt. Of Maharashtra Directorate of Industries publication.